RNI No. MAHBIL /2009/29236

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ९, अंक १] गुरुवार ते बुधवार, जानेवारी ५-११, २०२३/पौष १५-२१, शके १९४४ [पृष्ठे १६, किंमत : रुपये १६.००

प्राधिकृत प्रकाशन

शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

सार्वजनिक आरोग्य विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक १९ डिसेंबर २०२२.

अधिसूचना

भारतीय ख्रिश्चन विवाह अधिनियम, १८७२ (कायदा क्रमांक १५/१८७२).

क्रमांक भाख्रिवि-२०२१/१९३७/प्र.क्र. ८३२/कु.क.— भारतीय ख्रिश्चन विवाह अधिनियम, १८७२ (कायदा क्रमांक १५/१८७२) च्या कलम ६ व ९ मधील तरतुदीनुसार **पास्टर ॲलन मनवेल लोबो** यांना **“ द बायबल बिलिवर्स चर्च, नंदाखाल, विरार (प.) ४०१ ३०१ ”** या नोंदणीकृत चर्चमध्ये भारतीय ख्रिश्चन विवाह योग्य त्या विधीसह लावण्याचा परवाना ख्रिश्चन विवाह परवाना क्रमांक ०६/२०२२ तसेच सदर विवाहाचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार शासन प्रदान करीत आहे. **पास्टर ॲलन मनवेल लोबो** यांनी विवाह विधी पार पाडताना उक्त अधिनियमातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नंदकुमार आंदळकर,
शासनाचे अवर सचिव.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

वाचावे.–(१) व्यवस्थापक, श्री भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, आदर्की बु., ता. फलटण, जि. सातारा यांचे दिनांक १३ जून २०२२ चे पत्र व त्यासोबतचा प्रस्ताव.

(२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पतसंस्था/सआ-५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२०१८/२७७४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८.

(३) या कार्यालयाचे शुद्धीपत्रक जा.क्र. पतसंस्था/स.आ.५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२०१९/१८५६, दिनांक ११ जुलै २०१९.

(४) या कार्यालयाचे आदेश क्र. पतसंस्था/सआ-५/खर्च/वसुली आदेश/२०१८, दिनांक ६ एप्रिल २०१८.

आदेश

क्रमांक पतसंस्था/स.आ./का.क १५६/श्री भैरवनाथ ग्रा. बि. शे. सह. पत., आदर्की/२०२२/३६४४—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, डी. बी. मुकणे, अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, श्री भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, आदर्की बु., ता. फलटण, जि. सातारा या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) व नियम, १९६१ मधील नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे :—

अ.क्र. (१)	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव (२)	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा (३)	शक्तीची व्याप्ती (४)	कार्यक्षेत्र (५)
१	श्री. इकबाल गफुर सुभेदा	सरव्यवस्थापक	विशेष वसुली व विक्री अधिकारी	संस्थेच्या मंजूर कार्याक्षेत्रापुरते.
२	श्री. विलास विनायक खुडे	क्लार्क	विशेष वसुली व विक्री अधिकारी	संस्थेच्या मंजूर कार्याक्षेत्रापुरते.

अटी .—

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व या कार्यालयाकडील परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९८ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी दरमहा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रपत्र १, २, ३ व ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग, दोन विभाग अथवा राज्य कार्यक्षेत्र आहे त्या संस्थांनीदेखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उप निबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(६) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र. २३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही या कार्यालयकडील दिनांक ६ जून २०१९ च्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

(७) वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हील कोर्ट", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(८) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर " श्री भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, आदर्की बु., ता. फलटण, जि. सातारा " असा फलक लावता येऊ शकेल.

(९) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१०) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व दिनांक ६ एप्रिल २०१८ रोजीचे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशामध्ये निश्चित केलेल्या हुकूमनाम्याच्या/वसुलीच्या दाखल्याच्या आदेशिकेचा खर्चाच्या (Cost of Process) दराने वसूल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही. सदर खर्चाची आकारणी व विनियोग याबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवावयाचा असून त्याची तपासणी संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून करून घ्यावयाची आहे.

(११) वसुली अधिकाऱ्याने या कार्यालयाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ व दिनांक ११ जुलै २०१९ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे. सदर परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(१२) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस/आदेश/घोषणा पत्र यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

(१३) संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापक यांनी वसुली दाखल्यांबाबत दाखल प्रकरणे व संख्यात्मक आढाव तसेच प्रपत्र-१ ते ४ मध्ये वसुली अधिकारी निहाय वसुली कामकाजाचा आढावा दर महिन्यांला या कार्यालयास सादर करावा.

पुणे,
दिनांक १२ डिसेंबर २०२२.

डी. बी. मुकणे,
अपर निबंधक, सहकारी संस्था,
(पतसंस्था), महाराष्ट्र राज्य, पुणे.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

वाचावे.—(१) चेअरमन/व्यवस्थापक, स्वराज्य नागरी सहकारी पतसंस्था मर्या., ता. फलटण, जि. सातारा यांचे दिनांक ५ एप्रिल २०२२ चे पत्र व त्यासोबतचा प्रस्ताव.

(२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पतसंस्था/सआ-५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२०१८/२७७४, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८.

(३) या कार्यालयाचे शुद्धीपत्रक जा.क्र. पतसंस्था/स.आ.५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२०१९/१८५६, दिनांक ११ जुलै २०१९.

(४) या कार्यालयाचे आदेश क्र. पतसंस्था/सआ-५/खर्च/वसुली आदेश/२०१८, दिनांक ६ एप्रिल २०१८.

आदेश

क्रमांक पतसंस्था/स.आ./का.क १५६/स्वराज ना. सह पत., फलटण/२०२२/३५३३.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, डी. बी. मुकणे, अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, स्वराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. फलटन, जि. सातारा या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) व नियम, १९६१ मधील नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२५ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे :—

अ.क्र.	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा	शक्तीची व्याप्ती	कार्यक्षेत्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	श्री. कदम वसंत बापुराव	व्यवस्थापक	विशेष वसुली व विक्री अधिकारी	मुंबई, सातारा, सोलापूर, पुणे, अहमदनगर, नवी-मुंबई, रायगड जिल्ह्यापुरते.

अटी .—

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व त्याखालील नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व या कार्यालयाकडील परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९८ अन्वये प्राप्त संस्थेच्या वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिताच असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी दर महा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रपत्र १, २, ३ व ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास व या कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग, दोन विभाग अथवा राज्य कार्यक्षेत्र आहे त्या संस्थांनीदेखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उप निबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी. व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(६) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही. या कार्यालयाकडील दिनांक ६ जून २०१९ च्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

(७) वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट ", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(८) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "स्वराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या., फलटन, जिल्हा सातारा " असा फलक लावता येऊ शकेल.

(९) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१०) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व दिनांक ६ एप्रिल २०१८ रोजीचे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशामध्ये निश्चित केलेल्या हुकूमनाम्याच्या/वसुलीच्या दाखल्याच्या आदेशिकेचा खर्चाच्या (Cost of Process) दराने वसूल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही. सदर खर्चाची आकारणी व विनियोग याबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवावयाचा असून त्याची तपासणी संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून करून घ्यावयाची आहे.

(११) वसुली अधिकाऱ्याने या कार्यालयाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ व दिनांक ११ जुलै २०१९ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे. सदर परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(१२) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस/आदेश/घोषणापत्र यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

(१३) संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापक यांनी वसुली दाखल्याबाबत दाखल प्रकरणे व संख्यात्मक आढावा तसेच प्रपत्र क्र. १ ते ४ मध्ये वसुली अधिकारी निहाय वसुली कामकाजाचा आढावा दर महिन्याला या कार्यालयास सादर करावा.

पुणे,
दिनांक ५ डिसेंबर २०२२.

डी. बी. मुकणे,
अपर निबंधक, सहकारी संस्था,
(पतसंस्था), महाराष्ट्र राज्य, पुणे.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

वाचावे.—(१) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एडीएम १८४/१५६(२), दिनांक १९ मार्च १९६८.

(२) शासनाची अधिसूचना क्रमांक सीएसएल. १६०५/प्र.क्र. १२०/१५-स, दिनांक २ एप्रिल २००५.

(३) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक ना. बँका/डी-४/ना.पत/क. १५६/प्रशिक्षण/०५, दिनांक १३ जुलै २००५.

(४) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक ना. पत/डी-४/पतसंस्था/का.क १५६/११, दिनांक २१ नोव्हेंबर २०११.

(५) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट याचिका क्रमांक १९४२/२०१३, दिनांक ५ डिसेंबर २०१५ चे आदेश.

(६) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक जा. क्र. पतसंस्था/स.आ. ५/वसुली अधिकारी नियुक्ती फेरनियुक्ती/२४७४/२०१८/दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८.

(७) दि महाराष्ट्र को-ऑप. हाऊसिंग फायनान्स कॉपोरेशन लि., मुंबई यांचे दिनांक २१ जुलै २०२२ रोजीचे पत्र.

आदेश

क्रमांक गृह/डी-३/म.हौ. फा कॉ/कलम १५६/अधिकार/१४-सआ/२०२२/१६४९.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, श्री. शैलेश कोतमिरे, अपर निबंधक (गृहनिर्माण) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. हाऊसिंग फायनान्स कॉपोरेशन लि., मुंबई या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे :—

अ.क्र. (१)	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव (२)	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा (३)	शक्तीची व्याप्ती (४)	कार्यक्षेत्र (५)
१	श्री. आनंदा शिवाजी कांबळे	कनिष्ठ अधिकारी	वसुली अधिकारी	मुंबई, रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर.
२	श्री. राजेंद्र बबनराव देशमुख	प्र. जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	नाशिक
३	श्री. मनोहर विश्वासराव पवार	मुख्य लिपिक/निरीक्षक	वसुली अधिकारी	नाशिक
४	श्री. सुभाष यशवंत पाचपुते	मुख्य लिपिक/निरीक्षक	वसुली अधिकारी	जळगाव
५	श्री. विजय शिवाजीराव मराठे	जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	धुळे
६	श्री. विजय शिवाजीराव मराठे	जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	नंदुरबार
७	श्री. सुनिल किसनराव लोटके	मुख्य लिपिक/निरीक्षक	वसुली अधिकारी	अहमदनगर
८	श्री. विठ्ठल भुजंगराव ढाकणे	मुख्य लिपिक/निरीक्षक	वसुली अधिकारी	अहमदनगर
९	श्री. मंगेश रामचंद्र बाठे	मुख्य लिपिक/निरीक्षक	वसुली अधिकारी	पुणे
१०	श्री. नितिन माधवराव डेरे	जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	सातारा
११	प्रकाश आण्णापपा आलासे	जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	कोल्हापूर
१२	श्री. अविनाश व्यांकटेश जुगुळकर	मुख्य लिपिक/निरीक्षक	वसुली अधिकारी	कोल्हापूर
१३	श्री. मिठू वालचंद राठोड	जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	सोलापूर
१४	श्री. सुरेश रत्नाकर पाटील	प्र. जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	सांगली
१५	श्री. सुनिल पुडलिक चन्ने	जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	औरंगाबाद
१६	श्री. शैलेंद्र भास्करराव मेश्राम	मुख्य लिपिक/निरीक्षक	वसुली अधिकारी	औरंगाबाद
१७	श्री. मिर्झा नवाब बेग सलीम बेग	प्र. जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	नांदेड
१८	श्री. शिवाजी राधोजी भागवत	मुख्य लिपिक/निरीक्षक	वसुली अधिकारी	नांदेड
१९	श्री. अभंग आण्णा पाटिल	जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	लातूर

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२०	श्री. माधव आकुशराव जाधव	जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	उस्मानाबाद
२१	श्री. आत्माराम आनंदा जवंजाळ	मुख्य लिपिक/निरीक्षक	वसुली अधिकारी	जालना, हिंगोली, परभणी.
२२	श्री. अमर बाळासाहेब पवळ	प्र. जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	बीड
२३	श्री. दिनेशकुमार चंद्रकिशोर मिश्रा	प्र. जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	नागपूर, वर्धा.
२४	श्री. रमेश संतोषराव बोडखे	कनिष्ठ अधिकारी	वसुली अधिकारी	नागपूर
२५	श्री. अजयकुमार भाऊराव मिश्रा	सहाय्यक निरीक्षक	वसुली अधिकारी	चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा.
२६	श्री. दिनकर अभिमानजी चंदन	जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	अमरावती
२७	श्री. कुसुमाकर गोपाळराव शिरपूरकर	प्र. जिल्हा व्यवस्थापक	वसुली अधिकारी	यवतमाळ, अकोला, वाशिम, बुलढाणा.

अटी .—

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व या कार्यालयाकडील परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९१ अन्वये प्राप्त संस्थेच्या वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी दरमहा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अ-३, अ-४ व ब कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग, दोन विभाग अथवा राज्य कार्यक्षेत्र आहे त्या संस्थांनीदेखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उप निबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक १९४२/२०१३, दि बेसिन कॅथोलिक को-ऑप. बँकविरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेला आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

(६) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(७) वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि/किंवा " सिव्हील कोर्ट ", "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(८) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामिनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामिनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसुल करण्याची कार्यवाही करावी.

(९) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसुलपात्र रक्कम व सरचार्ज रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसुल करता येणार नाही.

शैलेश कोतमिरे,

पुणे.

अपर निबंधक (गृहनिर्माण),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

THE HIGH COURT AT BOMBAY

APPELLATE SIDE

No. A-1202/2022.— The Honourable the Chief Justice and the Honourable Judges are pleased to grant the following Officers leave for the period mentioned against their names :—

	Name and Designation	*Period*
1.	Shri D. M. Upadhye, Judge, Family Court, Dhule.	Ex-post facto sanctionto the Earned Leave for 5 days from 1st September 2022 to 5th September 2022 prefixing holiday on 31st August 2022 with permission to leave headquarter from 30th August 2022 (A.O.H.) till 6th September 2022 (B.O.H.).
2.	Smt. V. P. Ingle, the then President, Maharashtra State Co-operative Appellate Court, Mumbai now Principal District and Sessions Judge, Aurangabad.	Earned leave for 4 days from 5th September 2022 to 8th September 2022 prefixing holiday from 31st August 2022 to 4th September 2022 and suffixing holidays from 9th September 2022 to 11th September 2022 with permission to leave headquarters from 30th August 2022 (A.O.H.) till 12th September 2022 (B.O.H.).
3.	Shri R. R. Pondkule, Judge, Family Court, Amravati.	Earned leave for 2 days from 5th September 2022 to 8th September 2022 suffixing holidays on 9th September 2022 to 11th September 2022 with permission to leave headquarter from 5th September 2022 (B.O.H.) till 12th September 2022 (B.O.H.).
4.	Smt. I. J. Nanda, Principal Judge, Family Court, Aurangabad.	Earned leave for 10 days from 5th September 2022 to 14th September 2022 prefixing holiday on 4th Septembert 2022 with permission to leave headquarters from 4th September 2022 (A.O.H.) till 15th September 2022 (B.O.H.).
5.	Shri M. Q. S. M. Shaikh, the then Principal District and Sessions Judge, Ratnagiri now Principal District and Sessions Judge, Jalgaon.	Earned leave for 3 days from 6th September 2022 to 8th September 2022 prefixing holidays on 4th September 2022 and 5th September 2022 and suffixing holidays on 9th September 2022 to 11th September 2022 with permission to leave headquarters from 4th September 2022 (B.O.H.) till 12th September 2022 (B.O.H.).

On return from leave above Judicial Officers are reposted to their respective posts.

Certified under rule 39 of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 that above Judicial Officers would have continued to officiate in their respective posts had they not proceeded on leave during the above period.

(II)

Name of the Judicial Officer	*Judicial Officers with whom charge is kept during the leave period of concern Judicial Officers.*
1. Shri D. M. Upadhye	Shri A. H. Sayyed, District Judge-4 and Additional Sessions Judge, Dhule.
2. Smt. V. P. Ingle	Smt. S. R. Pawar, Member, Maharashtra State Co-operative Appellate Court, Bench at Pune.
3. Shri R. R. Pondkule	Shri P. J. Modak, District Judge-2 and A.S.J., Amravati.
4. Smt. I. J. Nanda	Smt. S. A. Sinha, Judge, Family Court, Aurangabad.
5. Shri M. Q. S. M. Shaikh	Shri D. L. Nikam, District Judge-1 and A.S.J., Khed from 4th Sepember 2022 (B.O.H.) till 6th September 2022 (B.O.H.), with Smt. M. R. Satav, Civil Judge Senior Division, Ratnagiri from 4th September 2022 (B.O.H.) till 6th September 2022 (B.O.H.) for Administrative work and with Shri L. D. Bile, District Judge-1 and A.S.J., Ratnagiri from 6th September 2022 (B.O.H.) till 12th September 2022 (B.O.H.).

High Court, Bombay,
29th November 2022.

D. S. DESHMUKH,
Registrar,
(Insp. II).

BY THE FAMILY COURT GREATER MUMBAI AT BANDRA

Read.—(1) Civil Manual Part-I Para No. 699(*i*) and 698

(2) Hon'ble High Court, Email dated 24th November 2022

(3) Hon'ble High Court, Bombay Letter No. X(Gen)-0202/2022/2430, dated 21st December 2022.

NOTIFICATION

O.W. No. Estt./1959/2022.— The following is the list of Holidays Fixed for Courts and Offices of the Family Court, Mumbai at Bandra for the Year 2023.

All Sundays, 2nd & 4th Saturday.

Sr. No. (1)	Name of Holiday (2)	Date and Month (3)	Day (4)
01	Republic Day	26th January 2023	Thursday
02	Holi (2nd day)	07th March 2023	Tuesday
03	Gudi Padwa	22nd March 2023	Wednesday
04	Mahavir Jayanti	04th April 2023	Tuesday
05	Good Friday	07th April 2023	Friday
06	Dr. Babasaheb Ambedkar Jayanti	14th April 2023	Friday
07	Maharashtra Day	01st May 2023	Monday
08	Buddha Pournima	05th May 2023	Friday
09	Bakri Id	29th June 2023	Thursday
10	Moharrum	29th July 2023	Saturday
11	Independence Day	15th August 2023	Tuesday
12	Parsi New Year	16th August 2023	Wednesday
13	Shri Ganesh Chaturthi	19th September 2023	Tuesday
14	***Gauri Pujan (Additional Holiday)**	22nd September 2023	Friday
15	Anant Chaturdashi/Id-E-Milad	28th September 2023	Thursday
16	Mahatma Gandhi Jayanti	02nd October 2023	Monday
17	Dassera	24th October 2023	Tuesday
18	Additional for Diwali	13th November 2023	Monday
19	Diwali (Balipratipada)	14th November 2023	Tuesday
20	Additional for Diwali	15th November 2023	Wednesday
21	Additional for Diwali	16th November 2023	Thursday
22	Additional for Diwali	17th November 2023	Friday
23	Additional for Diwali	18th November 2023	Saturday
24	Guru Nanak Jayanti	27th November 2023	Monday
25	Christmas	25th December 2023	Monday
	TOTAL HOLIDAYS : 25 DAYS		

Note : No days have been notified as Holidays on account of

01	Chatrapati Shivaji Maharaj Jayanti	19th February 2023	Sunday
02	Ramzan Id	22th March 2023	4th Saturday
03	Diwali (Laxmipujan)	12th November 2023	Sunday

As They Fall on Sundays and 4th Saturday

Note.—The Family Court, Mumbai at Bandra shall observe 2nd and 4th Saturdays of each month as Holidays and to work on the remaining Saturdays of the Month for full day.

S. A. CHAUHAN,
Principal Judge,
Family Court, Mumbai.

Family Court, Mumbai,
dated 22nd December 2022.

CHIEF JUDGE, COURT OF SMALL CAUSES, MUMBAI

Ref.— (1) Chapter XXXVI, Appendix-G of the Civil Manual, 1986.

(2) This Office Letter No. SCC/Public Holiday List-2023/7016/2022, dated 3rd/6th December 2022.

(3) High Court E-mail Letter No. X(Gen.)-0202/2022/2391, dated 16th December 2022.

NOTIFICATION

No. SCC/Public Holiday List-2023/7196/2022.— In exercise of powers vested under section 92 of the Presidency Small Causes Court Act, 1882, the undersigned Shri Shrikant L. Anekar, Chief Judge, Court of Small Causes, Mumbai to hereby declare Holidays and Vacations to be observed by Court of Small Causes, Mumbai during the Calendar Year-2023, as per the list annexed hereto, as per the approval accorded by the Hon'ble High Court, *vide* its Letter, dated 16th December 2022 under reference.

Mumbai, SHRIKANT L. ANEKAR,
dated 17th December 2022. Chief Judge.

LIST OF HOLIDAYS AND VACATIONS TO BE OBSERVED BY THE COURT OF SMALL CAUSES AT MUMBAI DURING THE CALENDAR YEAR-2023

Annexture to this Office Letter No. SCC/Public Holiday List-2023/7197/2022, dated 17th December 2022 :—

Sr. Nos. (1)	Name/Occasion of the Holiday (2)	Dates on which Holiday falls in the Year 2023 (3)	Day (4)
1	Republic Day	26th January 2023	Thursday
2	Holi (2nd day)	7th March 2023	Tuesday
3	Gudi Padwa	22nd March 2023	Wednesday
4	Mahavir Jayanti	4th April 2023	Tuesday
5	Good Friday	7th April 2023	Friday
6	Dr. Babasaheb Ambedkar Jayanti	14th April 2023	Friday
7	Maharashtra Day	1st May 2023	Monday
8	Buddha Pournima	5th May 2023	Friday
9	Bakari Id	29th June 2023	Thursday
10	Moharrum	29th July 2023	Saturday
11	Independence Day	15th August 2023	Tuesday
12	Parsi New Year	16th August 2023	Wednesday
13	Additional Holiday for Gopalkala	7th September 2023	Thursday
14	Ganesh Chaturthi	19th September 2023	Tuesday
15	Gauri Pujan	22nd September 2023	Friday

(1)	(2)	(3)	(4)
16	Anant Chaturdashi and Id-E-Milad	28th September 2023	Thursday
17	Mahatma Gandhi Jayanti	2nd October 2023	Monday
18	Dasara	24th October 2023	Tuesday
19	Diwali Holidays	13th November 2023 to 18th November 2023	Monday to Saturday
20	Guru Nanak Jayanti	27th November 2023	Monday
21	Christmas	25th December 2023	Monday

Note : Following Holidays fall on 4th Saturday and Sunday.
Hence, they have not been notified as holidays.

Sr. Nos. (1)	**Name / Occasion of Holiday** (2)	**Date on which Holiday falls in the Year 2023** (3)	**Day** (4)
1	Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti	19th February 2023	Sunday
2	Ramzan Id	22nd April 2023	Saturday

VACATIONS

1. SUMMER VACATION : From Monday, the 8th May, 2023 to Sunday, the 4th June, 2023 (Both days inclusive).
2. CHRISTMAS VACATION : From Monday, the 25th December, 2023 to Monday, the 01st January, 2024 (both days inclusive).

SHRIKANT L. ANEKAR,
Chief Judge.

Mumbai,
Dated 17th December 2022.

STATEMENT SHOWING NUMBER OF HOLIDAYS, VACATIONS AND COURT WORKING DAYS TO BE OBSERVED BY THE COURT OF SMALL CAUSES, MUMBAI DURING THE CALENDAR YEAR-2023

MONTHS (1)	HOLIDAYS (2)	VACATIONS (3)	NO. OF WORKING DAYS OTHER THAN SATURDAY (4)	WORING SATURDAYS (5)	TOTAL WORKING DAYS (6)
JANUARY	26 (1)	—	21	7,21 (2)	23
FEBRUARY	—	—	20	4,18 (2)	22
MARCH	7,22 (2)	—	21	4,18 (2)	23
APRIL	4,7,14 (3)	—	17	1,15,29 (3)	20
MAY	1,5 (2)	08-05-2023 to 31-05-2023	3	6 (1)	4
JUNE	29 (1)	01-06-2023 to 04-06-2023	19	17 (1)	20
JULY	29 (1)	—	21	1,15 (2)	23
AUGUST	15,16 (2)	—	21	5,19 (2)	23
SEPTEMBER	7, 19, 22 & 28 (4)	—	17	2,16,30 (3)	20
OCTOBER	2,24 (2)	—	20	7,21 (2)	22
NOVEMBER	27 & 13 to 18 (7)	—	16	4 (1)	17
DECEMBER	25 (1)	25-12-2023 to 31-12-2023	16	2,16 (2)	18
TOTAL	**26**	—	**212**	**23**	**235**

Mumbai,
dated 17th December 2022.

SHRIKANT L. ANEKAR,
Chief Judge.

नागरी नेमणुका

विभाग प्रमुख आणि इतर सर्व संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, राजपत्रित अधिकाऱ्यांच्या रजा, बदल्या, नेमणुका, शक्ती आणि त्यांच्या इतर वैयक्तिक बाबी यासंबंधीचे आदेश शासनाकडून राजपत्राच्या या भागात अधिसूचनांच्या स्वरूपात प्रकाशित केले जातात ; त्यामुळे वरील बाबीसंबंधी सर्व संदर्भ निकालात निघाले आहेत असे समजण्यात यावे. अशा अधिसूचनांमुळे त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्यांची कार्यमुक्ती व तत्सम बाबी यासंबंधी आनुषंगिक आदेश काढणे आवश्यक असल्यास राजपत्र मिळाल्यानंतर त्यांनीच ते काढले पाहिजेत. कारण शासनाकडून इतर कोणतेही आदेश काढले जाणार नाहीत.

नगरविकास विभाग

मंत्रालय (मुख्य इमारत), ४था मजला, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० डिसेंबर २०२२.

अधिसूचना

क्रमांक एमसीओ-२०२२/प्र.क्र. ०२/नवि १४.— मुख्याधिकारी गट-अ संवर्गातील, श्री. गिरीश चं. बन्नोरे हे त्यांच्या दिनांक ५ जून १९६४ या जन्मदिनांकानुसार दिनांक ३० जून २०२२ (म.नं.) रोजी नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत.

श्री. गिरीश चं. बन्नोरे यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी वा न्यायालयीन प्रकरण सुरु नसून, त्यांचेविरुद्ध अन्य विभागीय चौकशीची प्रकरणे प्रस्तावित असल्यास त्यांचेविरुद्धच्या शिक्षेच्या अनुषंगाने कार्यवाही पुढे सुरू राहील. तसेच, त्यांचेकडून शासनाचे काही येणे बाकी असल्यास, त्यासंदर्भातील वसुलीच्या अधीन राहून, श्री. गिरीश चं. बन्नोरे यांना शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार दिनांक ३० जून, २०२२ (म.नं.) रोजीच्या सेवानिवृत्तीस या अधिसूचनेद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अशोक लक्कस,
शासनाचे अवर सचिव.

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ डिसेंबर २०२२.

अधिसूचना

क्रमांक कृषिआ ३१२२/प्र.क्र. २८७/१६-अे.— श्री. मुकेश जगदिशलाल वर्मा, कृषि अधिकारी (सामान्य), पंचायत समिती, शिरपुर, जिल्हा परिषद, धुळे यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६(१) नुसार दिनांक १ जानेवारी २०२३ (म.पू.) पासून शासन सेवेतून स्वेच्छा सेवानिवृत्त होण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ज्योत्स्ना अर्जुन,
कार्यासन अधिकारी.

विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३रा मजला, ई विंग, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन,

माझगाव, मुंबई ४०० ०१०.

क्रमांक राउआ-२०२२/आस्थापना-२ व ३/सेवानिवृत्त/ब-१६१८.— या कार्यालयाच्या संगणकीय सूचीप्रमाणे या विभागातील निम्नर्निर्देशित राजपत्रित अधिकारी हे दिनांक ३१ डिसेंबर २०२२ (म.नं.) पासून नियत वयोमानानुसार शासन सेवेतून निवृत्त होत आहेत :—

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	पदनाम	महाविकास सांकेतांक
१	श्रीमती पूजा विजय आंब्रे	राज्यकर अधिकारी (मुविका) क-०१४, वांद्रे, मुंबई	MUM-BST-C-014

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ मधील नियम १३५ अन्वये, राजपत्रित अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीची तारीख **शासकीय राजपत्रात** अधिसूचना देण्यासाठी, या कार्यालयाच्या स्तरावरील सदर अधिसूचित सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत फेरबदल झाल्यास ते बदल करण्याच्या अधीन राहून सदर सूची निर्गमित करण्यात येत आहे.

संबंधित अधिकारी वरील दिनांकास प्रत्यक्षात शासकीय सेवेतून निवृत्त झाले किंवा त्यांना सेवानिवृत्तीनंतर सेवेत वाढ झाली किंवा कसे याची खात्री करून त्यांना कार्यमुक्त केल्याच्या कार्यावाहीचा अहवाल कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्रासहीत विनाविलंब या कार्यालयास पाठवावा, जेणेकरून त्यांच्या निवृत्तीची अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध करणे सुलभ होईल.

वरील अधिकाऱ्यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्र व महाराष्ट्र कोषागार नियम, २३६ चा दाखला (ना मागणी प्रमाणपत्र) महालेखापाल महाराष्ट्र-१, मुंबई, नागपूर-२ यांच्या कार्यालयास परस्पर पाठवावा. तसेच जे अधिकारी शासकीय निवासस्थानात राहत असतील, त्यांच्या निवृत्तीबाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात कळवावे व आवश्यक दाखला मागवावा.

ज्या अधिकाऱ्यांबाबत महसूलहानी/विभागीय चौकशी कार्यवाही सुरू आहे किंवा प्रस्तावित आहे अशा अधिकाऱ्यांच्या प्रकरणी होणाऱ्या निर्णायाच्या अधिन राहून निवृत्ती वेतन लाभाच्या कार्यवाही करावी.

संबंधित अधिकाऱ्यांस नियमित सेवानिवृत्ती वेतन व सेवालाभ देण्यास काही कारणास्तव विलंब होणार असल्यास तात्पुरते निवृत्ती वेतन व सेवालाभ देण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम १२६/१३० नुसार आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.

महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई, नागपूर-२ यांच्याकडून अंतिम निवृत्ती वेतन व सेवा लाभाची रक्कम शक्य तितक्या लवकर मंजूर होईल. याबाबत कृपया आवश्यक कार्यवाही करावी.

मुंबई,
दिनांक २७ डिसेंबर २०२२.

अनिल कुदळे,
राज्यकर उप आयुक्त (आस्थापना) २,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.